# संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृध्दी योजना-

ग्राम विकास विभाग, शा.नि.क्र. तांडा सुधार-२०१९/प्र.क्र.६७/आस्था-५, दि.२३.०२.२०२४ अन्वये "संत सेवालाल महाराज बंजारा / लामण तांडा समृध्दी योजना" सुरू करण्यात आली आहे.

बंजारा / लमाण तांडयांना महसूली गाव घोषित करणे, तांडयात ग्रामपंचायत स्थापन करणे व इतर अनुषंगीक कामासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच, बंजारा / लमाण तांडया अंतर्गत मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. ग्राम विकास विभागाच्या दि.०९.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये बंजारा/लमाण तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत निर्मितीसाठी असणारी १००० लोकसंख्येची अट शिथिल करून ७०० इतकी करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्यातील १,३४८ तांड्यामध्ये एकूण रू.१३९.३५ कोटी रक्कमेच्या विविध विकास कामास मंजूरी देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषदांच्या मागणीनुसार दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेर खालील प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

| अ.क्र | जिल्हा परिषद | वितरीत केलेला निधी रक्कम (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | सोलापूर | १४०.०० |
| २ | जळगाव | ६३७.०० |
| ३ | धुळे | १४७.०० |
| ४ | नंदूरबार | ११५.५० |
| ५ | परभणी | ४६९.०० |
| ६ | लातूर | ३०४.५० |
| ७ | धाराशिव | ११२.०० |
| ८ | हिंगोली | २०६.५० |
| ९ | नांदेड | १५३३.०० |
| १० | अमरावती | १८२.०० |
| ११ | यवतमाळ | १०६४.०० |
| १२ | नागपूर | ६३.०० |
| १३ | रायगड | ७०.०० |
| १४ | छत्रपती संभाजीनगर | १०११.५० |
| १५ | वाशिम | ३९२.०० |
| १६ | बुलढाणा | ५२१.५० |
| | **एकुण** | **६९६८.५०** |

*************